जिल्हा परिषद शिक्षकाच्या जिल्हातंर्गत बदली प्रक्रियेत चिन्हांकीत केलेल्या (Mapping) अनिवार्य रिक्त जागांवर (Compulsary Vancancy) पदस्थापना न देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१९/प्रक्र १/ आस्था १४**
२१ मर्झबान पथ, फोर्ट
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २८/१/२०१९

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्या संगणकीय प्रणालीव्दारे करण्याबाबत दिनांक २७/२/२०१७ च्या शासन निर्णयाव्दारे शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. असे करतांना प्राधान्याने जिल्हा परिषदेत शिक्षकांची रिक्त पदे विचारात घेऊन त्या संख्येएवढया रिक्त जागा हया " अनिवार्य रिक्त जागा " (Compulsary Vancancy) म्हणून चिन्हांकीत करण्याबाबत (Mapping) वरील धोरणात्मक निर्णयात नमूद केले आहे. शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्या करतांना जिल्हयात असणारी रिक्त पदांची संख्या बदलत नसल्याने आणि सदरची रिक्त पदे ही जिल्हयातील शाळांमध्ये समानपणे रिक्त ठेवल्याने उपलब्ध शिक्षकाच्या नियुक्त्या संतुलीतपणे होऊन जिल्हयातील सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारा शिक्षक वर्ग समानपणे वाटप होण्यास मदत होते.यामुळे जिल्हयातंर्गत बदल्या करण्याआधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अनिवार्य रिक्त जागा जाहीर करणे सदर शासन निर्णयान्वये बंधनकारक केलेले आहे. अशाप्रकारे अनिवार्य रिक्त जागा म्हणून जाहीर केलेल्या पदांवर शिक्षकांना पदस्थापना देता येणार नाही.

या सदंर्भात काही जिल्हा परिषदांमध्ये अनिवार्य रिक्त जागा चिन्हांकीत (Mapping) करतांना संदिग्धता आहे. तसेच या संदर्भात शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्यांची कार्यवाही पुर्ण झाल्यावर या अनिवार्य रिक्त जागांवर नेमकेपणाने नियुक्ती देण्याबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन करणे गरजेचे झाले आहे. सदर विषयाबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) समानीकरण हे तत्व विदर्यार्थ्याच्या हक्कासाठी स्विकारणे गरजेचे आहे कोणत्याही परिस्थितीत यामध्ये तडजोड करता येणार नाही. यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समानीकरणासाठी प्रत्येक वर्षी अनिवार्य रिक्त जागा ठेवून त्या चिन्हांकीत कराव्यात. अशा अनिवार्य रिक्त जागा चिन्हांकीत केल्यानंतर त्यामध्ये शासनाच्या परवानगीशिवाय बदल करता येणार नाही. तथापि, शिक्षकांची नवीन भरती अथवा खाजगी शाळातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन इत्यादि कारणामुळे जर नवीन शिक्षक जिल्हा परिषदांमध्ये येत असतील तरच समानीकरणासाठी चिन्हांकीत केलेल्या अनिवार्य रिक्त जागांमध्ये शासनाच्या परवानगीने बदल करण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

२) जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त पदांचा विचार करुन शासनाच्या दिनांक २७/२/२०१७ च्या शासन निर्णयाव्दारे दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संपूर्ण जिल्हा परिषदेतील रिक्त जागांचे तालुका निहाय व शाळा निहाय समान वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

**३)** अनिवार्य रिक्त जागा (Compulsary Vancancy) **चिन्हांकीत** (Map )**करतांना त्या काळजीपूर्वक करावयात त्यामध्ये चुका राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.**

४) संगणकीय प्रणालीव्दारे **चिन्हांकीत** (Map) केलेल्या या अनिवार्य रिक्त जागा (Compulsary Vancancy ) **या एनआयसी** (NIC), **पुणे यांनी संगणकीय प्रणालीवर** Block **कराव्यात .**

५) **भविष्यात जिल्हयामध्ये नवीन शिक्षकांची नियुक्ती अथवा प्रतिनियुक्ती झाल्याशिवाय सदरच्या जागा या संगणकीय प्रणालीवर खुल्या केल्या जाणार नाहीत याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.**

६) सदर अनिवार्य रिक्त जागांवर शालार्थ मधून वेतन निघणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकारी यांची राहील .

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०१२८१४२९४५९९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.01.29 13:20:18 +05'30'

**(प्रियदर्शन शं.कांबळे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव

४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग

८) कोकण विभागीय आयुक्त, नवी मुंबई.

९) शिक्षण आयुक्त, पुणे

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

११) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय कोकण (सर्व विभाग)

१२) संचालक शालेय शिक्षण,पुणे.

१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

१४) तांत्रिक संचालक, एनआयसी, पुणे.

१५) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग

१६) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.